0001

<u>नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर</u>

**वाचा :-**

१) या कार्यालयाचे दक्षता शाखेकडून दिनांक २५/०७/२०१२ रोजी प्राप्त झालेला अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५०/२०१२/जा.५०५, दिनांक २५/०७/२०१२, ०७/०८/२०१२, १६/०८/२०१२ व २३/०८/२०१२.

३) सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक ३१/०७/२०१२ रोजीचे अभिवेदन.

४) मे. गायत्री वेअरहाऊसचे मालक मंगला दामजी भानुशाली यांचे दिनांक ०१/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

५) या कार्यालयाची पत्र" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५०/२०१२/जा.५२३, दि. ०२/०८/२०१२.

६) श्री व्हेन्यू एक्सपोर्टस् यांचे दि. ०८/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

७) सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक १३/०८/२०१२ व १६/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

८) मे. गायत्री वेअरहाऊसचे मालक मंगला दामजी भानुशाली यांचे दिनांक १६/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

९) मे. कमलेश ट्रेडिंग कंपनी, मे. बिजल ट्रेडिंग कंपनी, मे. मनाली ट्रेडिंग कंपनी, मे. अविनाशी कॅनवासिंग, मे. धीरजलाल विरजी ॲण्ड कंपनी, मे. छेडा ब्रदर्स, मे. मादामल तिलोकचंद, मे. प्रकाश कॉर्पोरेशन, मे. वसुंधरा ट्रेडिंग कंपनी, मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. व मे. श्री व्हेन्यू एक्सपोर्टस यांचे दिनांक २२/०८/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

१०) सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २३/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

११) मे. फाईन फुड प्रॉडक्टस् यांचे दिनांक २४/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदन.

१२) या कार्यालयाची पत्र" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५०/२०१२/जा.५९०, दि. २४/०८/२०१२.

१३) मे. मनसुख हरिलाल ट्रेडिंग कंपनी, मे. किरीटकुमार प्रेमजी धारोड ॲण्ड कंपनी, मे. एम.के. ट्रेडर्स व मे. शितल स्टोअर्स यांचे दिनांक २९/०८/२०१२ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

१४) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचा दिनांक २९/०८/२०१२ रोजी प्राप्त अहवाल.

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५०/२०१२/जा. ६२०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इंशुरस इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : ०७ /०९/२०१२.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

<u>आ दे श</u>

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

प्रकरणाची पार्श्वभूमी :-

दिनांक २१/०७/२०१२ रोजी या कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक खबरीनुसार या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचांसह मे. गायत्री वेअरहाऊसिंग, प्लॉट क्र. १९, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई या गोदामात प्रवेश केला. सदर इमारतीच्या फाटकामधून प्रवेश केल्यानंतर उजव्या बाजूला गोदामाचे कार्यालय असल्याचे अधिकाऱ्यांना आढळले. अधिकाऱ्यांनी पंचांसमवेत कार्यालयात प्रवेश केला असता, कार्यालयात तीन व्यक्ती बसलेल्या असल्याचे आढळले. अधिकाऱ्यांना तिन्ही व्यक्तींना त्यांची ओळख करुन देऊन तेथे येण्याचे प्रयोजन सांगून पंचांसमक्ष तिन्ही व्यक्तींकडे त्यांच्या नावाची व गोदामातील कामाबाबत चौकशी केली असता, त्यांनी त्यांची नांवे राहूल नामवर सिंग, मंगेश जगन्नाथ कांबळे आणि तुलसी वेलजी भानुशाली असे सांगून ते अनुक्रमे सदर गोदामात ज्युनिअर मॅनेजर, स्टोअरकिपर आणि मॅनेजर म्हणून काम पाहत असल्याचे सांगितले.

त्यानंतर अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष सदरच्या गोदामाची आणि गोदामात असलेल्या अन्नधान्याच्या अनुषंगाने परवाना, साठापुस्तक, बिले इत्यादी कागदपत्रांची उपस्थित व्यक्तींकडे चौकशी व पडताळणीसाठी मागणी केली असता, राहुल सिंग यांनी १) मे. हरिओम एंटरप्रायझेस व मे. कृष्णा एंटरप्रायझेस यांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांचेकरिता मे. गायत्री वेअरहाऊसिंग यांना व्यवसायाकरिता दिलेले नाहरकत पत्र, २) सिडको, मे. डी. गिरीशकुमार कंपनी आणि मे. कृष्णा एंटरप्रायझेस यांचे मधील नोटरीकृत ट्रायपार्टी अग्रीमेंटची जागेबाबतची प्रमाणीत छायाप्रत व ३) मे. हरिओम एंटरप्रायझेस व मे. कृष्णा एंटरप्रायझेस आणि मे. श्री. गायत्री वेअरहाऊसिंग यांचेतील दिनांक २५/०४/२०१३ रोजी संपुष्टात येणारे नोटरीकृत लिव अँण्ड लायसन्स करारपत्राची छायाप्रत इत्यादी कागदपत्रे सादर केली.

सदर कागदपत्रांची अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष पडताळणी केल्यानंतर मे. गायत्री एंटरप्रायझेस यांचे नावे संयुक्त घाऊक परवाना ते सादर करु न शकल्याने तसेच ज्या व्यापारी संस्थांचा माल गोदामात साठवणूक केला आहे. त्यांच्या साठ्याबाबत वैध कागदपत्रे सादर करु शकले नाहीत. तसेच त्यांचेकडील साठापुस्तक गुजराजी भाषेत असल्याचे व ते दिनांक १४/०७/२०१२ पर्यंतच लिहिलेले असल्याचे अधिकाऱ्यांना आढळले. त्यानंतर अधिकाऱ्यांनी कोणत्या व्यापारी संस्थेचा किती साठा गोदामात आहे. याबाबत पंचासमक्ष विचारणा केली असता, राहुल सिंग यांनी त्यांच्या गोदामातील साठ्याची सर्व माहिती त्यांच्या संगणकांत असून संगणक खराब झाल्याने सदर माहिती देऊ शकत नसल्याचे सांगितले. सबब, अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष राहुल सिंग आणि मंगेश कांबळे यांच्या सहाय्याने प्रत्यक्ष साठा मोजणी सुरु केली. दरम्यान राहुल सिंग यांनी भ्रमणध्वनीवर संपर्क करुन संगणक दुरुस्त करण्याऱ्या मेकॅनिकला बोलावून घेतले.

सदर संगणक सुरु झाल्यानंतर राहूल सिंग यांनी अधिकाऱ्यांना पंचांसमक्ष यातील व्यापारी संस्था निहाय नोंदविलेली साठा माहिती दाखविली. ती खालीलप्रमाणे,

| अ.क्र. | व्यापारी संस्थेचे नांव | जिन्नस | साठा (किलो ग्रॅम) |
|---|---|---|---|
| १ | मे. कमलेश ट्रेडिंग कंपनी | तांदूळ | ८०५७० |
| २ | मे. बिजल ट्रेडिंग कंपनी | तांदूळ | ६६२०० |
| ३ | मे. मनाली ट्रेडिंग कंपनी | तांदूळ | १०७०२० |
| ४ | मे. मनसुख हरिलाल ट्रेडिंग कंपनी | तांदूळ | ३०३७५ |
| ५ | मे. अविनाशी कॅनवासिंग | तांदूळ | ३२०० |
| ६ | मे. धीरजलाल विरजी ॲण्ड कंपनी | तांदूळ | १६१५० |
| ७ | मे. फाईल फुड प्रॉडक्टस् | तांदूळ | १६८४६० |
| ८ | मे. छेडा ब्रदर्स | तांदूळ | ५४२६५ |
| ९ | मे. किरीटकुमार प्रेमजी धराडे ॲण्ड कंपनी | तांदूळ | ८०७७० |
| १० | मे. मादामल तिलोकचंद | तांदूळ | ५५६८० |
| ११ | मे. एम.के. ट्रेडर्स | तांदूळ | २३७५० |
| १२ | मे. प्रकाश कॉर्पोरेशन | तांदूळ | २४२५० |
| १३ | मे. वसुंधरा ट्रेडिंग कंपनी | तांदूळ | ६०९७५ |
| १४ | मे. शितल स्टोअर्स | तांदूळ | ३२५० |
| १५ | मे. ताज अग्रो कमोडिटीज | पिवळे मसुर | ४५२० |
| | एकूण | | ७७९४३५ |

वरील व्यापारी संस्थांनी वेअरहाऊसमध्ये साठवणूक करण्याबाबत साठा खरेदी बिले इत्यादी बाबतची चौकशी अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष केली असता, ती नसल्यांचे आढळले.

वर नमुद केल्याप्रमाणे ७७४९१५ कि.ग्रॅ. तांदूळ आणि ४५२० कि.ग्रॅ. तुरदाळ असा एकूण ७७९४३५ कि.ग्रॅ. साठा हा साठवणूकीच्या आवश्यक कागदपत्र व परवान्याशिवाय आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष सदर साठा ताब्यात घेतला. गोदामातील हळद, जिरे, मेहंदी, मोहरी, सुंठ, चिंचपेस्ट इ. जीवनावश्यक वस्तू व्यतिरिक्तचा साठा जप्त करावयाचा नसून गोदाम सिलबंद करावयाचे असल्याने तो हलविण्याच्या सुचना राहुल सिंग यांना दिल्या. तथापी, त्यांनी तो हलवायचा नसल्याचे सांगितले. अधिकाऱ्यांनी पंचांसमक्ष गोदामाच्या मागील व पुढील दरवाजे कुलूपबंद करुन शासकीय शिक्क्यानिशी गोदाम सिलबंद केले. अशाप्रकारे जप्त करण्यात आलेला ७७४९१५ कि.ग्रॅ. तांदळाची अंदाजित सरासरी दर रुपये ३०/- प्रति किलो प्रमाणे किंमत रुपये २,३२,४७,४५०/- व तुरडाळ ४५२० कि.ग्रॅ. अंदाजित सरासरी दर रुपये ६०/- प्रति किलो प्रमाणे किंमत रुपये २,७१,२००/- असा एकूण २,३५,१८,६५०/- किंमतीचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त केला.

अशाप्रकारे मे. गायत्री वेअरहाऊसच्या मालक मंगला दामजी भानुशाली आणि ज्युनिअर मॅनेजर राहुल सिंग यांनी विनापरवाना तांदूळ व तुरडाळ या जीवनावश्यक वस्तूंची साठेबाजी केल्याचे तपासणीमध्ये निष्पन्न झाल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० व महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती

आदेश १९९८ च्या तरतुदींचा भंग केल्यावरुन संबंधितांविरुध्द ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०६१/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती उपनियंत्रक शिधावाटप (अंमल), मुंबई यांनी वाचावे क्र. १ अन्वये केलेली असून जीवनावश्यक वस्तुंमधील डाळी/कडधान्य या अनुसूचीत वस्तूंचा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणूक केलेला विनापरवाना साठा शासनजमा का करण्यात येवू नये ? याबाबत वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व संबंधितांना कारणे दाखवा नोटीस बजावून त्यांचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात आली असून त्याकरीता या कार्यालयात दिनांक ३१/०७/२०१२ रोजी सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ३१/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. ए. एन. काटकर यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर करुन पुढील तपास सुरु असल्याने सुनावणीची पुढील तारीख मिळण्याची विनंती केली. तसेच सदर सुनावणीस मे. गायत्री वेअरहाऊसचे ज्युनिअर मॅनेजर राहूल नामवर सिंग व मे. गायत्री वेअरहाऊसच्या वतीने ॲड. श्री. सुनिल एन. मोकल हे वकालतनाम्यासह उपस्थित राहिले व त्यांनी लेखी निवेदन सादर करण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १४/०८/२०१२ रोजी ठेवण्याची विनंती केली. सदरचा जप्त साठा हा इतर व्यावसायीक यांचा असल्याचे सांगून त्या अनुषंगाने विविध आस्थापनांसोबत साठवणूकीकरिता करारनामा नसल्याचे सांगितले. जप्त साठ्याबाबत त्यांना अधिक विचारणा केली असता ते अनभिज्ञ असल्याचे सांगून साठा मालक याबाबतची माहिती व साठा संबंधीचे पुरावादर्शक कागदपत्रे सादर करु शकतील असे सांगितले. सबब, मे. गायत्री वेअरहाऊसचे मालक तसेच नमूद गोदामातील जप्त साठ्याचे मालकांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक १४/०८/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २१/०७/२०१२ रोजी घटनास्थळी गोदामातील हळद, जिरे, मेहंदी, मोहरी, सुंठ, चिंचपेस्ट इ. जीवनावश्यक वस्तू व्यतिरिक्तचा साठा जप्त करावयाचा नसून गोदाम सिलबंद करावयाचे असल्याने तो हलविण्याच्या सुचना उपस्थित इसम राहुल सिंग यांना दिल्या. तथापी, त्यांनी तो हलवायचा शक्य नसल्याचे सांगितले. तथापी, मे. गायत्री वेअरहाऊसचे मालक यांनी वाचावे क्र. ४ अन्वये केलेल्या विनंतीनुसार सदर गुन्हयात जप्त करण्यात आलेला परंतु अनुसुचित वस्तूंच्या यादीत समाविष्ठ नसलेला वरील नमूद साठा हा साठा मालकास परत करण्याची विनंती केली. सदर अर्जाचे अवलोकन करता, नमूद पदार्थांच्या यादीमध्ये यलो मस्टर्ड सिड १ मे. टन (राई) असे नमूद असून सदर साठा हा खाद्यतेल बियांमध्ये समाविष्ट असल्याने त्याच्या खरेदी, विक्री व साठवणूकीकरिता संबंधित साठा मालकाकडे परवाना आहे किंवा कसे ? याची अधिक खातरजमा करण्याकरिता नमूद वेअरहाऊसमधील अनुसुचित वस्तूंव्यतिरिक्त जप्त असलेला साठा हा खराब होऊ नये म्हणून त्यांच्या साठा

मालकास तात्काळ परत करण्याचे तसेच उर्वरीत अन्नधान्य, कडधान्य व खाद्यतेल बियांचा जप्त करण्यात आलेला साठा हा पुढील आदेशापर्यंत जैसे थे स्थितीत जतन करण्याबाबत या कार्यालयाचे वाचावे क्र. ५ अन्वये पत्र निर्गमित करण्यात आले.

दिनांक १४/०८/२०१२ रोजीची सुनावणी प्रशासकीय कारणास्तव रद्द करण्यात आली. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २२/०८/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस एपीएमसी पोलिस ठाणे येथील पो.ह.क्र. १४१ श्री. सी.बी. वक्टे हे उपस्थित राहिले व त्यांनी तपासी पोलिस अधिकारी यांचे वाचावे क्र. १० अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस मे. गायत्री वेअरहाऊसचे मालक मंगला दामजी भानुशाली यांनी उपस्थित राहून यापूर्वी वाचावे क्र. ४ व ८ अन्वये दिलेले निवेदन कायम असल्याचे सांगितले. तसेच सदर सुनावणीस मे. कमलेश ट्रेडिंग कंपनी तथा मे. बिजल ट्रेडिंग कंपनीचे मालक जितेंद्र मेघजी छेडा, मे. मनाली ट्रेडिंग कंपनीचे मालक राजेश मेघजी छेडा, मे. अविनाशी कॅनवासिंगचे मालक यांचे वतीने व्यवस्थापक सुमित दयालाल दामा (भानुशाली), मे. छेडा ब्रदर्सचे मालक कांतीलाल प्रेमजी छेडा, मे. धीरजलाल विरजी ॲण्ड कंपनीचे भागीदार सुरेश विरजी मारु, मे. मादामल तिलोकचंदचे मालक ईश मदनलाल गर्ग, मे. प्रकाश कॉर्पोरेशनचे मालक अनिल हिरालाल भद्रा, मे. वसुंधरा ट्रेडिंग कंपनीचे मालक धिरज कानजी कटारमल, मे. ताज अॅग्रो कमोडिटीज प्रा.लि.चे संचालक हिम्मत जे. चांद्रा व मे. श्री व्हेन्यू एक्सपोर्टसचे भागीदार अमिश कुवरजी मामानीया यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. ९ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले. तसेच सदर सुनावणीस मे. फाईन फुड प्रॉडक्टसचे मालक हिमांशु वसंत केसरीया हे उपस्थित राहिले. परंतू त्यांनी त्यांचे लेखी निवेदन टपालामार्फत वाचावे क्र. ११ अन्वये सादर केले. सदर सुनावणीस मे. कमलेश ट्रेडिंग कंपनी तथा मे. बिजल ट्रेडिंग कंपनीचे मालक जितेंद्र मेघजी छेडा यांनी सदरचे दोन्ही आस्थापनांचे ते एकमेव मालक असल्याचे सांगून त्यांनी अनुक्रमे घाऊक परवाना क्र. ४१५ व ३९० हे दोन वेगवेगळ्या पत्त्यावरील घाऊक परवाने सादर केले. याबाबत फ परिमंडळ कार्यायलयांस पुढील कार्यवाहीबाबत निर्देशित करण्यात आले. मे. अविनाशी कॅनवासिंगच्या वतीने उपस्थित व्यवस्थापक सुमित दयालाल दामा यांनी गायत्री वेअरहाऊसमधील जप्त करण्यात आलेल्या साठ्यापैकी त्यांचे कंपनीचे नावे दर्शविण्यात आलेला ३२०० किलो ग्रॅम तांदळाचा साठा हा मे. महावीर ट्रेडिंग कंपनीच्या मालकीचा असल्याचे सांगून त्यांची कंपनी कमीशन एजंट म्हणून काम करीत असल्याचे सांगितले. तथापी, सदर सुनावणीस मे. मनसुख हरीलाल ट्रेडिंग कंपनी, मे. किरीटकुमार प्रेमजी धरोड ॲण्ड कंपनी, मे. एम.के. ट्रेडर्स व मे. शितल स्टोअर्सचे मालक अथवा त्यांचे वतीने प्राधिकृत प्रतिनिधी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी पुढील सुनावणी दिनांक २९/०८/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

ECTOR OF CIVIL SUPPLIES
FICE

मे. गायत्री वेअरहाऊस यांनी वाचावे क्र. ८ अन्वये केलेल्या विनंतीनुसार नमूद वेअरहाऊसमधील जप्त साठा हा नाशवंत असल्याने तो खराब होऊ नये म्हणून सदर साठ्याची धुरीकरण (fumigation) करण्याबाबत या कार्यालयाचे वाचावे क्र. १२ अन्वये पत्र निर्गमित करण्यात आले आहे.

दिनांक २९/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस मे. गायत्री वेअरहाऊसचे व्यवस्थापक राहुल नामवर सिंग यांनी उपस्थित राहून यापूर्वीच सादर केलेले निवेदन कायम असल्याचे सांगितले. तसेच सदर सुनावणीस मे. मनसुख हरिलाल ट्रेडिंग कंपनीचे मालक नवीन मुरजी नंदू, मे. किरीटकुमार प्रेमजी धरोड ॲण्ड कंपनीचे भागीदार प्रेमजी वेलजी धरोड, मे. एम.के. ट्रेडर्सचे मालक मिना कानजी जोईसर व मे. शितल स्टोअर्सचे मालक गांगजी कल्याणजी भानुशाली यांनी उपस्थित राहून वाचावे क्र. १३ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केले. सदर सुनावणीस मे. महावीर ट्रेडिंग कंपनीचे मालक यांना पाचारण करुनही ते उपस्थित राहिले नाहीत. त्यामुळे नमुद गोदामातील ३२०० किलो तांदळाच्या साठ्याबाबत सुनावणीची प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत कोणीही दावा केलेला नाही.

सबब, प्रकरण गुणवत्तेवर निर्णयास्तव राखून ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

दिनांक ३१/०७/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. ए.एन. काटकर यांनी युक्तीवाद केला की, एकंदरीत झालेल्या तपासावरुन यातील अटक आरोपी यांनी आपसात संगणमत करुन त्यांचे मे. गायत्री वेअरहाऊसमध्ये २,३५,१८,६५०/- रुपये किंमतीचा अन्नधान्याचा साठा शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न होत आहे. यातील अटक आरोपी व पाहिजे आरोपी सौ. मंगला दामजी भानुशाली यांचेकडे केले तपासात त्यांनी शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) मिळणेकरता दिनांक २७/०९/२०१२ रोजी अर्ज करुन रक्कम भरलेली असून त्यांना अद्यापर्यंत शिधावाटप आस्थापनेकडून घाउक सयुंक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) मिळालेला नाही. गायत्री वेअरहाऊसकडे फक्त गुमास्ता परवाना आहे. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला अन्नधानाचा साठा आरोपीला सद्या परत न करता गुन्ह्याचा तपास चालू असून यातील १५ व्यापाऱ्यांकडे मालाबाबत विचारपुस करुन जबाब नोंदविणे बाकी आहेत. त्याकरिता सदर गुन्ह्यात त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्यासाठी त्यांना १५ दिवस मुदत वाढवून मिळण्यास विनंती करुन तसे लेखी अभिवेदन सादर केले.

मे. गायत्री वेअरहाऊसचे मालक मंगला दामजी भानुशाली यांचे दिनांक ०१/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, त्यांच्या गोदामात जीवनावश्यक वस्तूंच्या यादीत समाविष्ठ नसलेला मे. श्री व्हेन्यू एक्सपोर्टसचा साठा सिलबंद असल्याने तो मुक्त करण्याची विनंती केली. सदरचा साठा हा निर्यात करीता असल्याने व तो



...AD OF... ...UMBA

खरेदीदारास विहित वेळेत पाठवावयाचा असल्याने सदर साठा मे श्री व्हेन्यू एक्सपोर्टस् यांना परत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले. 0007

सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक १३/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, दिनांक ०४/०८/२०१२ रोजी श्री गायत्री वेअरहासिंग या गोडाऊमधील १६,४९,१४०/- रुपये किंमतीची हळद, जिरे, चिंचपेस्ट, सुंठ, मेहंदी पावडर, काळीमीरी छिलका, शेपु (दिल सीड), अजमोडा (सेलरी सीड) असा माल मे. वेणू एक्सपोर्टचे भागीदार श्री. अमीष कुवरजी मामानियॉ यांचे ताब्यात देण्यात आला आहे. वर नमूद जीवनावश्यक मालापैकी पिवळ्या रंगाची मोहरी ही तेलबीया प्रकारात मोडत असल्याने ती मुक्त न करता गुन्ह्यात जप्त करावयाची आहे, असे शिधावाटप अधिकारी श्री. पवार यांनी सांगितल्याने ५२,०००/- रुपये किंमतीची मोहरी गुन्ह्यात जप्त करुन ती श्री. गायत्री वेअरहाऊसिंगमध्यच सुरक्षित ठेवण्यात आली आहे. तसा दोन पंचासमक्ष सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे, असे नमूद आहे. तद्नंतर दिनांक १६/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला अन्नधान्य/कडधान्याचा साठा हा विविध व्यापाऱ्यांचा असून त्यांचा सदरचा साठा श्री गायत्री वेअरहाऊसिंगच्या मालकीन सौ. मंगला दामजी भानुशाली यांनी शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न झाले आहे. तरी नमूद धान्यांचा साठ्याबाबत योग्य तो आदेश होण्याची विनंती आहे, नमूद केले आहे.

मे. गायत्री वेअरहाऊसचे मालक मंगला दामजी भानुशाली यांचे दिनांक १६/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, त्यांच्या वेअरहाऊसमध्ये अन्नधान्याचे व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांनी शिधावाटप यंत्रणेच्या नियमांचा भंग केल्याने कारवाई करुन मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा साठा हा विविध व्यापाऱ्यांचा असल्याने त्यांचा साठा शासनजमा करण्यात का येऊ नये, याबाबत विचारणा करण्यासाठी साठामालकांना सुनावणीस पाचारण करण्यात यावे. घटनास्थळी त्यांच्याकडे गुमास्ता परवाना व्यतिरिक्त इतर आवश्यक परवाना नसल्याने कारवाई करण्यात आली आहे. जप्त करण्यात आलेला वेअरहाऊसमधील साठा हा विविध व्यापाऱ्यांचा असून त्यांच्याकडे वेअरहाऊसमध्ये साठवणूक करण्याकरिता आवश्यक परवाना आहे. त्यामुळे त्यांचा काहीही संबंध नसल्याने त्यांचे वेअरहाऊस सिलमुक्त करण्याची विनंती केली. सदर वेअरहाऊस त्यांच्या मालकीचा असून त्या गृहिणी असल्याने त्यांना या व्यवसायाबाबत काहीच माहिती नसल्याचे सांगून त्यांच्या व्यवस्थापकाने सदरचा सर्व साठा साठवणूक केला असल्याने ते अनभिज्ञ आहेत. जीवनावश्यक वस्तू कायदाचे कलम ६-अ चा उल्लघंन केल्याचे नमूद करुन त्यांना नोटीस बजावण्यात आली आहे. सदरचा साठा इतर व्यक्तींचा असून त्यांच्याकडे साठवणुकीचा परवाना असल्याने त्यांनी सदर साठ्याची त्यांच्या वेअर हाऊसमध्ये साठवणूक करण्याची परवानगी देऊन कोणंत्याही नियमांचा भंग केला नसल्याचे नमूद केले. ते घाऊक व्यापारी नसून ते वेअर हाऊसकिपर असल्याने त्यांना

शिधावाटप यंत्रणेचा कायदा लागू होत नाही. त्यामुळे शिधावाटप यंत्रणेच्या कायद्यानुसार वेअर हाऊसमधील साठा जप्त करण्याचा अधिकार नाही. सदर वेअर हाऊसमध्ये जीवनावश्यक वस्तू नसल्याने जर घटनास्थळी जीवनावश्यक वस्तूचा साठा मिळाला असता तर साठा जप्त करण्याचे अधिकार असल्याचे नमूद केले आहे. घटनास्थळी शिधावाटप अधिकाऱ्यांनी गोदामातील साठा नमूद करुन तो गोदामातील त्यांच्या अभिलेखाशी ताडून पाहिला आहे. मे. व्हेन्यू एक्सपोर्ट आणि ताज ॲग्रो कमोडिटीज यांचा निर्यात आणि आयात संबंधीचा साठा वेअर हाऊसमध्ये असल्याने सदर साठा हा शिधावाटप यंत्रणेच्या कायद्यामध्ये बसत नाही म्हणून तो साठा तात्काळ मुक्त करुन वेअर हाऊसमधील जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्यात यावा व धुरीकरण करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. कमलेश ट्रेडिंग कंपनीचे मालक जितेंद्र मेघजी छेडा यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा नमुद गोदामात साठा जप्त असुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिल, संयुक्त घाऊक परवाना, गुमास्ता परवाना, अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना, कृषी उत्पन्न बाजार समिती परवाना, विवरणपत्र, साठवणुक पावती व करारनामा सादर केला असुन त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. बिजल ट्रेडिंग कंपनीचे मालक जितेंद्र मेघजी छेडा यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा नमुद गोदामात साठा जप्त असुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिल, संयुक्त घाऊक परवाना, गुमास्ता परवाना, अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना, कृषी उत्पन्न बाजार समिती परवाना, विवरणपत्र, साठवणुक पावती व करारनामा सादर केला असुन त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. मनाली ट्रेडिंग कंपनीचे मालक राजेश मेघजी छेडा यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा नमुद गोदामात साठा जप्त असुन सदर साठयाच्या पुराव्यादाखल खरेदी बिल, संयुक्त घाऊक परवाना, गुमास्ता परवाना, अन्न व औषध प्रशासन विभागाचा परवाना, कृषी उत्पन्न बाजार समिती परवाना, विवरणपत्र, साठवणुक पावती व करारनामा सादर केला असुन त्यांचा जप्त साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. अविनाशी कॅनवासिंगचे मालक यांचे वतीने व्यवस्थापक सुमित दयालाल दामा (भानुशाली) यांनी सादर केलेल्या निवेदनात, गायत्री वेअरहाऊसमधील जप्त करण्यात आलेल्या साठ्यापैकी त्यांचे कंपनीचे नावे दर्शविण्यात आलेला ३२०० किलो ग्रॅम तांदळाचा साठा हा त्यांच्या मालकीचा नसुन सदरचा साठा हा मे. महावीर ट्रेडिंग कंपनीच्या मालकीचा असल्याचे सांगून त्यांची कंपनी

कमीशन एजंट म्हणून काम करीत असल्याचे सांगितले व पुराव्यादाखल मे. महावीर ट्रेडिंग कंपनी यांचे नावे असलेले खरेदी बिलाची छायांकित प्रत सादर केली.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. धीरजलाल विरजी ॲण्ड कंपनीचे भागीदार सुरेश विरजी मारु यांनी युक्तीवाद केला की, ते गेले ३४ वर्षे अन्नधान्याचा व्यवसाय करीत असुन ग्रोमा व एपीएमसीचे ते सभासद आहेत. त्यांचेकडे व्यवसायासाठी परवाने असल्याचे सांगुन त्यामध्ये शिधावाटप विभागाचाही परवाना आहे. सदर व्यवसायाबाबत ते वेळोवेळी शिधावाटप विभागास माहिती देत असुन सदर साठयाची दैनीक साठा नोंदवही अद्यावत ठेवल्याचे सांगुन ते मासिक विवरणपत्रही सादर करीत असल्याचे सांगितले. मे. गायत्री वेअरहाऊसमध्ये त्यांचा २५ किलोग्रॅम क्षमतेच्या ६४६ बाचक्यांमधील तांदळाचा साठा असल्याचे सांगुन त्याबाबतचे पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यात येत असल्याने त्यांच्या मालकीचा साठा त्यांना लवकरात लवकर परत करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. छेडा ब्रदर्सचे मालक कांतीलाल प्रेमजी छेडा यांनी युक्तीवाद केला की, त्यांनी उकडा तांदळाच्या २०६५ बाचक्यांमधील विविध व्यापाऱ्यांकडून खरेदी केलेला साठा नमुद गोदामात साठवणुक केले असल्याचे सांगुन त्याच्या पुराव्यादाखल विविध परवाने, गायत्री वेअरहाऊसींग सोबतचा करारनामा, सदर गोदामात साठवणुक केल्याबाबतच्या विनंती अर्जाच्या छायांकित प्रती सादर केले असल्याने त्यांचा जप्त असलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. मांदामल तिलोकचंदचे मालक ईश मदनलाल गर्ग यांनी युक्तीवाद केला की, ते मालक असल्याचे सांगुन कारणे दाखवा नोटीसच्या अनुषंगाने परवाने, दिनांक २०/०३/२०१० व दिनांक २६/११/२०१० रोजी कायमस्वरुपी गोदाम नोंदीकरीता ठाणे शिधावाटप कार्यालयात केलेला अर्ज व खरेदी बिलांच्या छायांकित प्रती इ. दस्ताऐवज सादर केले आहे. मागिल २० वर्षापासुन ते अन्नधान्याचा व्यवसाय करीत असल्याचे सांगुन त्यांचेकडील क्रमांक ३९१ अन्वये असलेला संयुक्त परवाना दिनांक ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असल्याचे सांगुन त्यांच्या गोदामात साठवणुकीकरीता जागा नसल्याने सदरचा साठा त्यांनी श्री गायत्री वेअरहाऊस येथे साठवणुक केल्याचे सांगुन सदर साठयाकरीता आवश्यक असलेले कागदपत्रे सादर केले असल्याने त्यांचा जप्त असलेला साठा लवकरात लवकर मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. प्रकाश कॉर्पोरेशनचे मालक अनिल हिरालाल भद्रा यांनी युक्तीवाद केला की, त्यांनी त्यांचा माल गायत्री वेअर हाऊसमध्ये भाडयाने उतरविला असुन त्या मालाच्या बिलाची कॉपी अटॅच केल्याचे सांगुन तसे लेखी निवेदन सादर केले.

OFFICE ...AI

0010 दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. वसुंधरा ट्रेडिंग कंपनीचे मालक धिरज कानजी कटारमल यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा साठा हा गायत्री वेअरहाऊस येथे जप्त केला असुन साठयाच्या पुराव्यादाखल विविध परवाने, ना हरकत पत्रासह करारनामा, मुळ बिलांच्या छायांकित प्रती सादर केल्या असल्याने त्यांचा साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि.चे मालक हिम्मत जे चांद्रा यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा ५० किलोग्रॅम क्षमतेच्या ८० बाचक्यांमधील ४ मेट्रीक टन व ३० किलोग्रॅम क्षमतेच्या १८२ बाचक्यांमधील ५.४६० मेट्रीक टन पीवळे मसुरचा साठा गायत्री वेअरहाऊस येथे साठवणुकीच्या उद्देशाने ठेवला असल्याचे सांगुन याबाबत आपल्या चर्चगेट येथील कार्यालयात माहिती दिली आहे. सदर साठयाच्या पुराव्यादाखल त्यांनी आयात परवाना व बिल ऑफ एन्ट्री सादर केले असल्याने त्यांचा साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २२/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. श्री व्हेन्यू एक्सपोर्टसचे भागीदार अमिश कुवरजी मामानीया यांनी युक्तीवाद केला की, त्यांचा पीवळे राई या बियांचा साठा हा मसाल्यांच्या पदार्थामध्ये समाविष्ट असल्याचे सांगुन त्याअनुषंगाने वाणिज्य मंत्रालय, भारत सरकार यांची यादी जोडण्यात आली आहे. ते स्पाईसेस बोर्ड ऑफ इंडीया येथे निर्यातदार म्हणुन नोंदणीकृत सदस्य असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडण्यात आले आहे. तसेच ते १०० टक्के मसाले पदार्थाचे निर्यातदार असुन ते स्थानीक बाजारपेठेत व्यवसाय करीत नसल्याचे सांगुन त्यांचा १ मेट्रीक टन पिवळया राई बियांचा साठा हा निर्यात करावयाचा असल्याने तात्काळ मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

सहाय्यक पोलिस निरिक्षक तथा तपासी पोलिस अधिकारी, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे दिनांक २३/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदनात, एकंदरीत झालेल्या तपासावरुन यातील अटक आरोपी यांनी आपसात संगणमत करुन त्यांचे मे. गायत्री वेअरहाऊसमध्ये २,३५,१८,६५०/- रुपये किमतीचा अन्नधान्याचा साठा शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न होत असल्याचे नमुद केले आहे.

मे. फाईन फुड प्रॉडक्टसचे भागीदार यांचे दिनांक २४/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त निवेदनात, ते मागील १३ वर्षापासुन अन्नधान्य व कडधान्यांचा व्यवसाय करीत असल्याचे सांगुन त्यांचेकडे ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला क्रमांक २७४ अन्वये संयुक्त घाऊक परवांना असल्याचे सांगुन त्यांच्या गोदामात साठवणुकीसाठी जागा नसल्याने त्यांनी गायत्री वेअर हाऊस येथे एपीएमसी प्राधिकरणाच्या परवानगीनुसार साठवणुक केल्याचे सांगुन या व्यतिरीक्त त्यांच्या घाऊक परवान्यावर गायत्री वेअरहाऊस म्हणुन अतिरीक्त गोदामाची नोंद आहे. जप्त

साठयाच्या पुराव्यादाखल त्यांनी आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात येत असल्याचे सांगुन त्यांचा जप्त साठा लवकरात लवकर मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २९/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. मनसुख हरिलाल ट्रेडिंग कंपनीचे मालक नवीन मुरजी नंदू यांनी युक्तीवाद केला की, कारणे दाखवा नोटीसच्या अनुषंगाने त्यांनी खरेदी बिले, गायत्री वेअरहाऊसिंग सोबतचा करारनामा, संयुक्त परवाना, साठा विवरणपत्र व मासिक विवरणपत्र सादर करीत असल्याचे सांगुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २९/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. किरीटकुमार प्रेमजी धरोड ॲण्ड कंपनीचे भागीदार प्रेमजी वेलजी धराडे यांनी युक्तीवाद केला की, ते नमुद आस्थापनेचे भागीदार असुन मागील १० वर्षे ते अन्नधान्य व कडधान्यांचा व्यवसाय करीत असल्याचे सांगुन त्यांचेकडे ३१/१२/२०१२ पर्यंत वैध असलेला क्रमांक २८६ अन्वये संयुक्त घाऊक परवाना असल्याचे सांगुन त्यांच्या गोदामात साठवणुकीसाठी जागा नसल्याने त्यांनी गोदाम मालकाशी भाडेतत्वाचा करारनामा करुन गायत्री वेअर हाऊस येथे एपीएमसी प्राधिकरणाच्या परवानगीनुसार साठवणुक केल्याचे सांगुन या व्यतिरीक्त त्यांच्या घाऊक परवान्यावर गायत्री वेअरहाऊस म्हणुन अतिरीक्त गोदामाची नोंद करण्यासाठी त्यांनी दिनांक ०६/०७/२०१२ रोजी फ परिमंडळ ठाणे येथील शिधावाटप कार्यालयात अर्ज केला असल्याचे सागितले. त्यांचा २५ किलोग्रॅम क्षमतेच्या १७६८ बाचक्यांमधील व ३० किलोग्रॅम क्षमतेच्या १२१९ बाचक्यांमधील ८०७.७ क्विंटल तांदळाचा साठा गायत्री वेअरहाऊस येथे साठवणुक केला असल्याचे सांगुन जप्त साठयाच्या पुराव्यादाखल त्यांनी आवश्यक कागदपत्रे सादर करण्यात येत असल्याचे सांगुन त्यांचा जप्त साठा लवकरात लवकर मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २९/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. एम.के. ट्रेडर्सचे मालक मिना कानजी जोईसर यांनी युक्तीवाद केला की, जप्त साठयाच्या पुराव्यादाखल संयुक्त परवाना, साठा विवरणपत्र व खरेदी बिलांच्या छायांकित प्रती सादर करुन आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा गायत्री वेअरहाऊसमधील जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २९/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मे. शितल स्टोअर्सचे मालक गांगजी कल्याणजी भानुशाली यांनी युक्तीवाद केला की, त्यांनी गायत्री वेअरहाऊस येथे २५ किलोग्रॅम क्षमतेच्या १३० बाचक्यांमधील तांदळाचा साठा साठवणुक केल्याचे सांगुन साठयाच्या पुराव्यादाखल संयुक्त परवाना, साठा विवरणपत्र, खरेदी बिले व कागदपत्रांच्या छायांकित प्रती सादर करुन आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली असल्याने त्यांचा गायत्री वेअरहाऊसमधील जप्त करण्यात आलेला साठा मुक्त करण्याची विनंती करुन तसे लेखी निवेदन सादर केले.

उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या अहवालात, जप्त साठ्याचे साठामालकांकडे महाराष्ट्र शेडयुल्ड कमोडीटीज होलसेल डिलर्स लायसंसिंग ऑर्डर, १९९८ अन्वये

अन्नधान्य/कडधान्याच्या घाऊक व्यापाराकरिता आवश्यक असलेल्या परवाना साठा मालकांनी धारण केला आहे किंवा कसे ? असल्यास त्याचे तपशिल, परवानाधारकाचा पत्ता, परवानावरील वेगळे गोदाम नमूद आहे किंवा कसे ? असल्यास त्यांचा तपशिल व नसल्यास जप्त करण्यात आलेल्या गोदामात साठा मालकांनी साठवणूक केल्याबाबतचे सुचनापत्र दिले आहे किंवा कसे ? तसेच परवाना असल्यास त्याची वैधता याबाबतचा साठामालक निहाय परिपूर्ण अहवाल सादर केला आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील अपचारी यांचा युक्तिवाद, निवेदन, पोलिसांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी, दिनांक २१/०७/२०१२ रोजी या कार्यालयातील फिरत्या पथकातील अधिकारी/कर्मचारी पंचासह मे. गायत्री वेअरहाऊसिंग, प्लॉट क्र. १९, सेक्टर १९, वाशी, नवी मुंबई या ठिकाणी टाकण्यात आलेल्या धाडीत विविध अन्नधान्य व कडधान्यांचा साठा हा साठवणूकीच्या आवश्यक कागदपत्र व परवान्याशिवाय आढळून आल्याने अधिकाऱ्यांनी पंचासमक्ष जप्त करुन संबंधितांविरुध्द जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७, ८, ९ व १० व महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश १९९८ च्या तरतुदींचा भंग केल्यावरुन ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०६१/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन वरील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२२२७ (अ), दिनांक २७ सप्टेंबर, २०११ अन्वये डाळी/कडधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तूंवर दिनांक ३०/०९/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत. तसेच केंद्र शासनाची अधिसुचना क्र. एस.ओ.२७१६ (अ), दिनांक २९ नोव्हेंबर, २०११ अन्वये तांदुळ या अनुसुचित वस्तूवर दिनांक ३०/११/२०१२ पर्यंत निर्बंध आहेत.

शासन परिपत्रक क्र. ईसीए-१००८/६२२/प्र.क्र.२८४/ना.पु.२३ दिनांक ९ मे, २००८ अन्वये शासनाने लागु केलेल्या साठामर्यादेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाही संदर्भातील मार्गदर्शक सुचनांमध्ये केंद्रशासनाने डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठयावर निर्बंध आणलेले आहेत त्यामुळे या वस्तुंचा व्यापार करण्यासाठी घाऊक अथवा किरकोळ परवाना घेणे आवश्यक आहे. डाळी, तांदुळ, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेबाबत लागु केलेले निर्बंध हे हया वस्तु आयात केल्यास त्यावर लागु राहणार नाहीत. तसेच आयात वस्तुंचा व्यापार करण्यासही प्रतीबंध राहणार नाही. मात्र त्या व्यापाऱ्यांना मासीक विवरणपत्र भरण्यास सांगण्यात यावे असे नमुद आहे. तसेच शासन परिपत्रक क्र. ईसीए-१०१०/४९५/प्र.क्र.९४/ना.पु.२३ दिनांक २० मे, २०१० अन्वये केंद्र शासनाने तांदुळ, धान, डाळी, खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या साठामर्यादेवर निर्बंध लागु केले आहेत. सबब, या

वस्तुंचा व्यापार व साठवणुक करण्याकरीता संबंधित अनुज्ञप्ती प्राधिकाऱ्याकडून परवाना घेणे आवश्यक आहे. या वस्तुंच्या आयातदारांना साठामर्यादेतुन सुट देण्यात आलेली आहे. परंतु खाद्यतेल व खाद्यतेलबिया यांच्या निर्यातदारांना परवाना घेणे आवश्यक आहे. म्हणजेच डाळी/कडधान्य तसेच अन्नधान्य, खाद्यतेल व खाद्यतेलबिया या अनुसुचित वस्तुंचा व्यापार करणारे घाऊक व्यापारी व निर्यातदार यांना सदर अनुसुचित वस्तुंच्या खरेदी, साठवणूक व विक्री करीता महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वये घाऊक परवाना घेण्याची आवश्यकता आहे.

महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश १९९८ अन्वयें देण्यात येणाऱ्या घाऊक परवानामधील "अट क्रमांक २(अ) नुसार अनुज्ञप्तधारक उपरोक्त व्यवसाय परवानामधील नमुद जागेत व्यवसाय करण्याबाबत" सुचित केलें असुन, अट क्रमांक २(ब) नुसार "अनुज्ञप्तीधारक ज्याला उपरोक्त धंदा चालवावयाचा आहे. अनुसुचित वस्तुचा परवानामध्ये उल्लेखिलेल्या गोदामांव्यतिरीक्त इतर कोणत्याही ठिकाणी साठवणुक न करण्याबाबत" नमुद आहे. तसेच "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविले पाहीजे व अनुज्ञाप्ती, बदल करण्यासाठी, अनुज्ञाप्ती प्राधिकरणाला सादर केली पाहिजे " असे स्पष्ट नमुद केले आहे.

एपीएमसी पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी तथा सहाय्यक पोलिस निरिक्षक श्री. ए.एन. काटकर यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात एकंदरीत झालेल्या तपासावरुन यातील अटक आरोपी यांनी आपसात संगणमत करुन त्यांचे मे. गायत्री वेअरहाऊसिंग या कंपनीमध्ये २,३५,१८,६५०/- रुपये किंमतीचा अन्नधान्य व कडधान्यांचा साठा शिधावाटप आस्थापनेचा घाउक संयुक्त परवाना (पीडीएल/एफडीएल) नसताना बेकायदेशिररित्या साठवणूक केला असल्याचे निष्पन्न होत असल्याचे सांगुन नमूद धान्याच्या साठ्याबाबत योग्य तो आदेश होणेस विनंती असल्याचे सांगितले.

मे. कमलेश ट्रेडिंग कंपनी, मे. बिजल ट्रेडिंग कंपनी, मे. मनाली ट्रेडिंग कंपनी, मे. धिरजलाल विरजी ॲन्ड कंपनी, मे. छेडा ब्रदर्स, मे. किरीटकुमार प्रेमजी धरोड ॲन्ड कंपनी, मे. मादामल तिलोकचंद, मे. वसुंधरा ट्रेडिंग कंपनी व मे. फाईन् फुड प्रॉडक्ट्स या सर्व आस्थापनांच्या मालकांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा नमूद गोदामात तांदळाचा साठा जप्त असून सदरचा साठा त्यांनी मे. गायत्री वेअरहाऊसच्या गोदामात साठवणुक केलें असल्याचे सांगितले. निवेदनासोबत उपरोक्त साठामालकांनी विविध परवाने, जप्त साठ्याच्या खरेदी बिले व इतर दस्ताऐवजांच्या सादर केलेल्या छायांकीत प्रतींचे अवलोकन करता सर्व आस्थापनांकडे महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये अन्नधान्याच्या व्यवसायाकरीता संयुक्त घाऊक परवाना आहे. सदरहु परवानाधारकांपैकी मे. फाईन फुड प्रॉडक्ट यांच्या संयुक्त घाऊक परवान्यावर वेगळे गोदाम म्हणुन मे. गायत्री

वेअरहाऊसिंग या गोदामाची नोंद असुन उर्वरीत साठा मालकांच्या परवान्यांवर वेगळे गोदामाची नोंद नसल्याचे आढळून येते. अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविणे बंधनकारक आहे." त्या अनुषंगाने मे. फाईन फुड प्रॉडक्ट वगळता इतर उर्वरीत साठामालकांनी त्यांच्या परवान्यावर मे. गायत्री वेअरहाऊस या अतिरीक्त गोदामाची नोंद करण्यासाठी अथवा सदर वेअरहाऊसवर त्यांचा साठा ठेवणार असल्याबाबत त्यांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे या अनुज्ञप्ती प्राधिकारी यांच्या कार्यालयात सुचनापत्र सादर केल्याचे छायांकित प्रतींवरुन दिसुन येते. सदर सुचनापत्र/अर्जाबाबत उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या परवानाधारक निहाय परीपूर्ण अहवालात नमुद केले आहे. उपरोक्त साठा मालकांनी त्यांच्या परवान्यांवरील पत्यावर पुरेशा जागा अभावी त्यांनी त्यांच्या मालकीचा खरेदी केलेला परवानावरील साठा त्यांनी तात्पुरत्या स्वरुपात मे. गायत्री वेअरहाऊस यांच्या गोदामात साठवणुक केले असल्याचे सादर केलेल्या कागदपत्रांवरुन दिसुन येत आहे. सबब, नमूद आस्थापनांच्या मालकांनी त्यांना देण्यात आलेल्या परवान्यांमधील अटींचे पालन करुन त्यांचा खरेदी केलेला तांदळाचा साठा हा अवैध साठवणुकीच्या उद्देशाने साठवणुक केल्याचे दिसुन येत नसल्याने मे. कमलेश ट्रेडिंग कंपनी, मे. बिजल ट्रेडिंग कंपनी, मे. मनाली ट्रेडिंग कंपनी, मे. धिरजलाल विरजी ॲन्ड कंपनी, मे. छेडा ब्रदर्स, मे. किरीटकुमार प्रेमजी धरोड ॲन्ड कंपनी, मे. मादामल तिलोकचंद, मे. वसुंधरा ट्रेडिंग कंपनी व मे. फाईन फुड प्रॉडक्ट्स या सर्व साठामालकांचा जप्त करण्यात आलेला तांदळाचा संपुर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. चे संचालक हिम्मत जमुनादास चंद्रा यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा ५० किलोग्रॅम क्षमतेच्या ८० बाचक्यांमधील ४ मेट्रीक टन व ३० किलोग्रॅम क्षमतेच्या १८२ बाचक्यांमधील ५.४६० मेट्रीक टन पिवळे मसुरचा साठा गायत्रीं वेअरहाऊस येथे साठवणुकीच्या उद्देशाने ठेवला असल्याचे सांगुन याबाबत या कार्यालयास माहिती दिली आहे. सदर साठयाच्या पुराव्यादाखल त्यांनी आयात परवाना व बिल ऑफ एन्ट्री सादर केले असल्याने त्यांचा साठा मुक्त करण्याची विनंती केली. घटनास्थळी साठा जप्तीच्या वेळेस उपस्थित इसमाने दिलेल्या जबाबानुसार मे. ताज ॲग्रो कमोडीटीज यांचा तुरडाळ या कडधान्याचा साठा जप्त असल्याचे नमुद आहे. तथापी, सुनावणीच्या वेळी मे. ताज ॲग्रो कमोडीटीजचे संचालक यांनी पुरावादर्शक कागदपत्रे सादर करुन नमुद गोदामात जप्त करण्यात आलेला कडधान्याचा साठा हा तुरडाळ नसुन पिवळे मसुर असल्याचे सांगितले. आयातदाराने आयात साठ्याबाबतची माहिती तसेच साठवणूकीबाबतची माहिती या कार्यालयास वेळोवेळी सादर करणे अभिप्रेत आहे. त्यानुषंगाने मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. यांनी या प्रकरणी जप्त करण्यात आलेला पिवळे मसुर या कडधान्याचा साठा आयात केल्याचे व नमुद गोदामावर साठवणुक केल्याबाबत या कार्यालयास दिनांक ०३/०७/२०१२ रोजी विवरणपत्र सादर केल्याचे आढळून आले आहे. मे. ताज

अग्रो कमोडिटीज प्रा.लि. यांनी आयात संबंधीचे सादर केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता, पिवळे मसुर या कडधान्याचा साठा त्यांनी बिल ऑफ एन्ट्री क्र. ४९६६८३८ दिनांक ०४/११/२०११ रोजी १२०२.४० क्विंटल साठा आयात केल्याचे तसेच त्यापैकी पिवळे मसुरचा साठा मे. गायत्री वेअरहाऊस या गोदामात साठवणूक केल्याचे दिसून येत आहे. सबब, मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. यांनी उपरोक्त आयात साठ्याबाबतचे सर्व कायदेशीर कागदपत्रे सादर केले असल्याने तसेच सदरचा साठा हा नजीकच्या कालावधीतला असल्याने मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. यांचा आयात केलेला साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने साठवणुक केला नसल्याने तो वैध असल्याचे दिसून येते. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेता जप्त साठ्याच्या मालकाने सादर केलेल्या पुरावादर्शक कागदपत्रावरुन जप्त करण्यात आलेला त्यांचा पिवळे मसुर या कडधान्याचा साठा हा वैध असल्याने शासन परिपत्रकानुसार आयात केलेल्या साठ्याबाबतची माहिती वेळोवेळी न चुकता या कार्यालयास सादर करण्याच्या अटीवर मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. यांचा जप्त करण्यात आलेला पिवळे मसुर या कडधान्याचा संपुर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. श्री व्हेन्यू एक्सपोर्टसचे भागीदार अमिश कुवरजी मामानीया यांनी सुनावणीचेवेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा पीवळे राई या बियांचा साठा हा मसाल्यांच्या पदार्थामध्ये समाविष्ट असल्याचे सांगुन त्याअनुषंगाने वाणिज्य मंत्रालय, भारत सरकार यांची यादी जोडण्यात आली आहे. ते स्पाईसेस बोर्ड ऑफ इंडीया येथे निर्यातदार म्हणुन नोंदणीकृत सदस्य असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रमाणपत्र जोडण्यात आले आहे. तसेच ते १०० टक्के मसाले पदार्थांचे निर्यातदार असुन ते स्थानीक बाजारपेठेत व्यवसाय करीत नसल्याचे सांगुन त्यांचा १ मेट्रीक टन पिवळया राई बियांचा साठा हा निर्यात करावयाचा असल्याने तात्काळ मुक्त करण्याची विनंती केली. मे. श्री व्हेन्यू एक्सपोर्टस यांचा नमुद वेअरहाऊस मधील अनुसुचित वस्तुंच्या यादीत समाविष्ट नसलेला साठा हा मुक्त करण्यात आला असुन त्यापैकी पिवळे राई हा अनुसुचित वस्तुंच्या यादीमधील खाद्यतेलबियाच्या परिशिष्टमध्ये समाविष्ट असल्याने पुढील तपासणीचे अधिन राहुन तात्पुरत्या स्वरुपात जप्त करण्यात आले. सदर साठयाच्या पुराव्यादाखल कागदपत्रांची पडताळणी करुन खातरजमा करण्यासाठी मे. श्री व्हेन्यू एक्सपोर्टस चे भागिदार यांना सुनावणीस पाचारण करण्यात आले असता, त्यांनी सदर साठा हा त्यांच्या मालकीचा असल्याचे तसेच त्याच्या पुराव्यादाखल त्यांनी खरेदीबिलांच्या छायांकित प्रती सादर केल्या आहेत. महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये खाद्यतेलबियांच्या व्यवसायासाठी ज्या व्यापाऱ्यांनी २० क्विंटल अथवा त्यापेक्षा अधिकचा साठा खरेदी अथवा साठवणुक केली असल्यास त्या व्यापाऱ्यास घाऊक परवाना घेणे आवश्यक आहे. सबब, मे. श्री व्हेन्यू एक्सपोर्टस यांचा जप्त करण्यात आलेला साठा हा १० क्विंटल असल्याने व तेवढया परीमाणाच्या साठवणुक अथवा व्यवसायासाठी परवाना घेण्याची आवश्यकता नसल्याने मे. श्री व्हेन्यू एक्सपोर्टस यांचा तात्पुरत्या स्वरुपात जप्त

करण्यात आलेला पिवळे राई या खाद्यतेलबियांचा संपुर्ण साठा हा त्यांना परत करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

मे. मनसुख हरीलाल ट्रेडिंग कंपनी, मे. एम. के. ट्रेडर्स, मे. प्रकाश कार्पोरेशन व मे. शितल स्टोअर्सचे मालक यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, त्यांचा नमूद गोदामात तांदळाचा साठा जप्त असून सदरचा साठा त्यांनी मे. गायत्री वेअरहाऊस या गोदामात साठवणुक केल्याचे सांगितले. निवेदनासोबत नमुद साठामालकांनी विविध परवाने तसेच सादर केलेल्या साठ्याच्या खरेदी बिलांच्या छायांकीत प्रतींचे अवलोकन करता महाराष्ट्र अनुसुचित वस्तु घाऊक व्यापार अनुज्ञप्ती आदेश, १९९८ अन्वये त्यांनी अन्नधान्याच्या व्यवसायाकरीता घाऊक परवाना घेतला असुन सदर परवान्यांवर वेगळया गोदामांची नोंद निरंक असल्याचे दिसुन येते. नमुद परवानाधारकांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे असुन शासनाची दिशाभुल करणारे आहे. अनुज्ञप्तीमधील अटीनुसार "अनुज्ञप्तीधारकाला नमुद केलेल्या ठिकाणाशिवाय इतर ठिकाणी त्याला अनुसुचित वस्तुंचा साठा ठेवण्याची इच्छा असल्यास त्याने त्याबाबत प्रत्यक्ष असे गोदाम कब्जात घेतल्यापासुन ४८ तासात कळविणे बंधनकारक आहे." तथापी, मे. मनसुख हरीलाल ट्रेडिंग कंपनी, मे. एम. के. ट्रेडर्स, मे. प्रकाश कार्पोरेशन व मे. शितल स्टोअर्स चे मालक या चारही आस्थापनांच्या मालकांनी उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे या अनुज्ञप्तीप्राधिकारी यांच्या कार्यालयात मे. गायत्री वेअरहाऊस या गोदामात त्यांचा तांदळाचा साठा ठेवल्याबाबतचे सुचनापत्र सादर न केल्याचे दिसुन येते. तसेच सदर साठा मालकांनी नमुद वेअरहाऊसमध्ये साठवणुक केल्याबाबतचे सुचनापत्र त्यांच्या कार्यालयात सादर न केल्याबाबत उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांनी सादर केलेल्या परवानाधारकनिहाय परिपुर्ण अहवालात नमुद केले आहे.

मे. अविनाशी कॅनवासिंगचे मालक यांचे वतीने व्यवस्थापक सुमित दयालाल दामा (भानुशाली) यांनी सुनावणीच्यावेळी केलेल्या खुलाशात, गायत्री वेअरहाऊसमधील जप्त करण्यात आलेल्या साठ्यापैकी त्यांचे कंपनीचे नावे दर्शविण्यात आलेला ३२०० किलो ग्रॅम तांदळाचा साठा हा त्यांच्या मालकीचा नसुन सदरचा साठा हा मे. महावीर ट्रेडिंग कंपनीच्या मालकीचा असल्याचे सांगून त्यांची कंपनी कमीशन एजंट म्हणून काम करीत असल्याचे सांगितले व पुराव्यादाखल मे. महावीर ट्रेडिंग कंपनी यांचे नावे असलेले खरेदी बिलाची छायांकित प्रत सादर केली. त्याअनुषंगाने मे. महाविर ट्रेडिंग कंपनीच्या मालकास त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी व जप्त साठयासंबंधी पुरावादर्शक कागदपत्रे सादर करण्यासाठी सुनावणीस पाचारण करण्यात आले. तथापी, मे. महावीर ट्रेडिंग कंपनीच्या वतीने सदर साठयाच्या मालकीचा दावा करण्यासाठी अथवा साठयाच्या पुराव्यादाखल आवश्यक परवाने अथवा कागदपत्रे सादर करण्यासाठी कोणीही उपस्थित राहीले नाही. त्यामुळे सदरचा जप्त करण्यात आलेला ३२०० किलोग्रॅम तांदळाचा साठ्याच्या मालकीचा कोणीही दावा केला नसल्याने सदरचा जप्त तांदळाचा साठा हा साठेबाजीच्या उद्देशाने विनापरवाना साठवणुक केल्याचे सिध्द होत आहे.

CONTROLLER OF RATIONING HEAD ... MUMBAI

सबब, मे. मनसुख हरीलाल ट्रेडिंग कंपनी, मे. एम. के. ट्रेडर्स, मे. प्रकाश कार्पोरेशन व मे. शितल स्टोअर्स चे मालक या चारही साठा मालकांनी त्यांच्या परवान्यावरील नमुद पत्याव्यतिरीक्त अन्य ठिकाणी साठवणुक केल्याचे सुचनापत्र अथवा परवान्यावर गोदामाची नोंद करुन न घेतल्याने त्यांनी महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ अन्वये त्यांना देण्यात आलेल्या परवानामधील तरतुदींचा व त्यामधील अटी/शर्तीचा तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ चा भंग केल्याचे निष्पन्न झाल्याने तसेच मे. अविनाशी कॅन्हॉसींग यांच्या नावे जप्त असलेला व कोणीही मालकीचा दावा केला नसलेला साठा हा संबंधित साठामालकाने अवैध साठवणुकीच्या उद्देशाने नमुद वेअरहाऊसमध्ये साठवणुक करुन महाराष्ट्र अनुसुचित वस्तू घाऊक व्यापार अनुज्ञाप्ती आदेश, १९९८ तसेच पर्यायाने जीवनावश्यक वस्तु कायदा, १९५५ च्या तरतुदींचा भंग केल्याचे निष्पन्न झाल्याने मे. मनसुख हरीलाल ट्रेडिंग कंपनी, मे. एम. के. ट्रेडर्स, मे. प्रकाश कार्पोरेशन व मे. शितल स्टोअर्स तसेच मे. अविनाशी कॅन्हॉसींग यांच्या नावे जप्त असलेला व कोणीही मालकीचा दावा केला नसलेला, या सर्व साठामालकांचा जप्त करण्यात आलेला तांदळाचा संपुर्ण साठा हा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी, मे. गायत्री वेअरहाऊसचे मालक मंगला दामजी भानुशाली यांनी सुनावणीच्या वेळी केलेल्या खुलाशात त्यांच्या वेअरहाऊसमध्ये अन्नधान्याचा व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांनी शिधावाटप यंत्रणेच्या नियमांचा भंग केल्याने कारवाई करुन मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरचा साठा हा विविध व्यापाऱ्यांचा असल्याने त्यांचा साठा शासनजमा करण्यात का येऊ नये, याबाबत विचारणा करण्यासाठी साठामालकांना सुनावणीस पाचारण करण्यात यावे. सदरचा साठा इतर व्यक्तींचा असून त्यांच्याकडे साठवणुकीचा परवाना असल्याने त्यांनी सदर साठ्याची त्यांच्या वेअर हाऊसमध्ये साठवणूक करण्याची परवानगी देऊन कोणत्याही नियमांचा भंग केला नसल्याचे नमूद केले. सदर वेअर हाऊसमध्ये जीवनावश्यक वस्तू नसल्याने जर घटनास्थळी जीवनावश्यक वस्तूचा साठा मिळाला असता तर साठा जप्त करण्याचे अधिकार असल्याचे सांगितले. यावरुन त्यांनी सादर केलेले निवेदन हे मोघम स्वरुपाचे व शासनाची दिशाभुल करणारे आहे. तथापी, मे. गायत्री वेअरहाऊसिंग चे मालक यांनी त्यांच्या वेअरहाऊसमध्ये विविध व्यापाऱ्यांचा अनुसुचित वस्तुंचा साठा हा साठवणुक करुन घेतांना सदरहु साठा मालकांनी त्यांच्या घाऊक परवान्यावर मे. गायत्री वेअरहाऊस या वेगळया गोदामाची नोंद केली आहे किंवा कसे ? याची खातरजमा करणे तसेच त्यासंबंधीचे पुरावादर्शक कागदपत्रे घेणे आवश्यक होते. तथापी, मे. गायत्री वेअरहाऊसचे मालक यांनी याबाबत संबंधित परवाना धारकांकडून सदर बाबत पूर्तता करुन न घेता अथवा संबंधित परवानाधारकास पुर्तता करुन घेण्यास आवश्यक करारनामा इ. कागदपत्रे उपलब्ध करुन न देता त्यांनी त्यांच्या गोदामात अवैध साठवणुक व साठेबाजीच्या उद्देशाने साठवणुक केलेल्या साठामालकास गैरमार्गाने मदत करुन त्यांनी स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीस प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न होत आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ३०६१/२०१२ दिनांक २२/०७/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

**आदेश :-**

१) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. कमलेश ट्रेडिंग कंपनी यांचा ८०५७० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

२) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. बिजल ट्रेडिंग कंपनी यांचा ६६२०० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

३) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. मनाली ट्रेडिंग कंपनी यांचा १०७०२० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

४) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. धिरजलाल विरजी ॲन्ड कंपनी यांचा ३६१५० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

५) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. छेडा ब्रदर्स यांचा ५४२६५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

६) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. किरीटकुमार प्रेमजी धरोड ॲन्ड कंपनी यांचा ८०७७० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

७) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. मादामल तिलोकचंद यांचा ५५६८० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

८) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. वसुंधरा ट्रेडिंग कंपनी यांचा ६०९७५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

९) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. फाईन फुड प्रॉडक्ट्स यांचा १६८४६० किलो तांदळाचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

१०) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. ताज अग्रो कमोडिटीज प्रा.लि. यांचा ४५२० किलो पिवळे मसुरचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

CONTROLLER OF RATIONI HEAD

११) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. श्री व्हेन्यू एक्सपोर्टस यांचा १० क्विंटल पिवळे राईचा संपूर्ण साठा हा बंधपत्र घेऊन त्यांना परत करण्यात यावा.

१२) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. मनसुख हरीलाल ट्रेडिंग कंपनी यांचा ३०३७५ किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१३) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. एम. के. ट्रेडर्स यांचा २३७५० किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१४) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. प्रकाश कार्पोरेशन यांचा २४२५० किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१५) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला मे. शितल स्टोअर्स यांचा ३२५० किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१६) प्रस्तूत प्रकरणी मे. अविनाशी कॅन्व्हॉसींग यांच्या नावे जप्त असलेला व कोणीही मालकीचा दावा केला नसलेला ३२०० किलो तांदळाचा संपूर्ण साठा शासनजमा करण्यात यावा.

१७) सदर शासनजमा करण्यात आलेला संपूर्ण तांदळाचा साठा पोलिसांनी, उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांच्या मदतीने वैध परवानाधारकास प्रचलित दराने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food, Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) मे. गायत्री वेअरहाऊसचे मालक मंगला दामजी भानुशाली
२) मे. कमलेश ट्रेडिंग कंपनीचे मालक
३) मे. बिजल ट्रेडिंग कंपनीचे मालक
४) मे. मनाली ट्रेडिंग कंपनीचे मालक

५) मे. मनसुख हरिलाल ट्रेडिंग कंपनीचे मालक
६) मे. धीरजलाल विरजी ॲण्ड कंपनीचे मालक
७) मे. फाईन फुड प्रॉडक्टस्‌चे मालक
८) मे. छेडा ब्रदर्सचे मालक
९) मे. किरीटकुमार प्रेमजी धरोड ॲण्ड कंपनीचे मालक
१०) मे. मादामल तिलोकचंदचे मालक
११) मे. एम.के. ट्रेडर्सचे मालक
१२) मे. प्रकाश कॉर्पोरेशनचे मालक
१३) मे. वसुंधरा ट्रेडिंग कंपनीचे मालक
१४) मे. शितल स्टोअर्सचे मालक
१५) मे. ताज अग्रो कमोडिटीजचे मालक
१६) मे. श्री व्हेन्यू एक्सपोर्टचे मालक

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एपीएमसी पोलिस ठाणे, नवी मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, ए.पी.एम.सी. पोलिस ठाणे, नवी मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल सात दिवसात या कार्यालयास सादर करावा.
२) उपनियंत्रक शिधावाटप, फ परिमंडळ, ठाणे यांना वरील नमुद दोषी परवानाधारकांवर तसेच जप्त मुद्देमालाच्या विल्हेवाटीच्या आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
३) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
४) कार्यासन अधिकारी, दक्षता शाखा, का.क्र. ५, प्रधान कार्यालय, मुंबई यांना माहितीस्तव.
५) निवड नस्ती.

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
सत्यमेव जयते
HEAD OFFICE
MUMBAI